# मुंबई विद्यापीठ

दिनांक २३ सप्टेंबर, २०१६.

विषय :- मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या (अनुदानित व विना अनुदानित) कला, वाणिज्य व विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था(अल्पसंख्याक महाविद्यालये) शिक्षकांच्या पदांची बिंदूनामावली/जाहिरात विशेष कक्ष विभागाकडून तपासणीकरिता लागणा-या कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत....

प्राचार्य/संचालक (अनुदानित व विनाअनुदानित) कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था, (अल्पसंख्यांक महाविद्यालये) यांना कळविण्यात येते की, शिक्षकांची पदे भरण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या विशेष कक्ष विभागाकडे पाठविण्यात येणा-या बिंदूनामावली/जाहिरातीच्या मसुद्यासोबत खालील नमुद केलेल्या दस्तऐवज/कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात. :-

१. शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी/जाहिरात मसुदा तपासणीकरिता नवीन महाविद्यालयास महाविद्यालय सुरु करण्यास शासनाकडून/विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या मान्यतेच्या पत्राची छायांकित प्रत. तसेच, अभ्यासक्रम सुरु करण्यास विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या मान्यतेच्या पत्राची प्रत,

२. शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणीकरिता कला, वाणिज्य, विज्ञान व्यवस्थापनशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था, अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालये, सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोकण विभाग, पनवेल यांचेकडून कार्यभारानुसार मंजूर पदांबाबतचे पत्र,

३. मुंबई विद्यापीठाकडून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणीकरिता नियुक्तीचे पत्र, तसेच राखीव प्रवर्गाकरिता जात व जात वैधता प्रमाणपत्र घेवून यावेत. तसेच, सहसंचालक, (मावक) कोकण विभाग, पनवेल यांचेकडून लगतच्या वर्षातील प्रमाणित बिंदूनामावलीच्या प्रती,

४. बिंदूनामावली, जाहिरात मसुदा तपासणीकरिता आर्कीटेक्चर/शिक्षणशास्त्र/अभियांत्रिकी महाविद्यालयांना शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र/NCTE/AICT चे मान्यतापत्र. महाविद्यालय/विधी महाविद्यालयांना बार कौन्सिल ऑफ आर्केटेक्चर/बार कौन्सिल ऑफ लॉ चे मान्यतापत्र.

५. महाविद्यालयांस अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झाला असल्यास शासनाचे पत्र व तसेच अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र,

६. अनुदानित महाविद्यालये तसेच अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांना सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोकण विभाग, पनवेल यांचेकडून पदे भरण्याबाबत देण्यात आलेल्या नाहरकत प्रमाणपत्राची प्रत,

७. अनुदानित/विना अनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांना ज्या शैक्षणिक वर्षाकरिता जाहिरात मसुदा मंजूर करावयाचा आहे, त्या शैक्षणिक वर्षालगतचे मुंबई विद्यापीठाकडे जमा केलेल्या वार्षिक संलग्नता शुल्क (Yearly Affiliation Fees) अनुदानित/विनाअनुदानित अल्पसंख्याक महाविद्यालयांनी ज्या शैक्षणिक वर्षामधील जाहिरात मसुदा मुंबई विद्यापीठाकडे जमा केलेल्या पावत्या विविध अभ्यासक्रमांसाठीचे सलग संलग्नता शुल्क (Continuation of Affiliation Fees) भरल्याच्या पावत्या. तसेच, वार्षिक संलग्नता शुल्क भरल्याची पावती.

उपरोक्त कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत संलग्नित असल्याची खात्री करुनच उक्त प्रस्ताव मुंबई विद्यापीठाच्या "विशेष कक्ष" विभागाकडे पाठविण्यात यावेत, जेणेकरुन बिंदूनामावली/जाहिरातीचा मसुदा त्वरीत मंजूर करणे शक्य होईल अन्यथा बिंदूनामावली जाहिरात मसुदा तपासण्यांस होणा-या विलंबास सर्वस्वी संस्था/महाविद्यालय जबाबदार राहील, याची कृपया नोंद घ्यावी.